पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/३/कावि/५११/२०१९
दिनांक - १७/०५/२०१९

प्रति,

मा.........................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा दिनांक – **२२/०५/२०१९** रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा **बुधवार**, दिनांक **२२/०५/२०१९** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १२०**

**दिनांक - २२/०५/२०१९** **वेळ – दुपारी ०२.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **बुधवार,** दिनांक **२२/०५/२०१९** रोजी दुपारी **०२.०० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

अ) दिनांक ०८/०५/२०१९ व दि.१५/०५/२०१९ (दु.१.५० वा.) रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.११८)** चा सभावृत्तांत कायम करणे.

ब) दिनांक दि.१५/०५/२०१९ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.११९)** चा सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) म.न.पा.च्या वतीने जलशुद्धीकरण केंद्र से.२३ अंतर्गत नागरिकांना पाणीपुरवठा सुरळित करणेसाठी पाणी पुरवठा विभागाच्या मागणीनुसार विविध पंप हाऊसमध्ये पंपिंग मशिनरी बसविणे, त्यासाठी वीजपुरवठा घेणे, पंपिंग मशिनरी वाढल्यास वाढीव वीजभार घेणे व पंपिंग मशिनरी कार्यान्वित करणे इ. स्वरूपाची कामे केली जातात. मनपाच्या पाणीपुरवठा व वितरण व्यवस्थे अंतर्गत रहाटणी येथील श्रीनगर परिसरात पाणी वितरण करणेसाठी मनपा मार्फत पाच लक्ष लिटर क्षमतेची पाण्याची उंच टाकी उभारण्यात आलेली आहे. सदरची टाकी ग्रॅव्हिटी लाईन द्वारे भरण्यात येत असून, ब-याच वेळेस ग्रॅव्हीटी लाईनमध्ये पुरेसा पाण्याचा दाब नसल्यामुळे टाकी पुर्ण भरत नाही. त्यामुळे पाणी वितरण व्यवस्था विस्कळीत होत आहे. पाणी पुरवठा विभागाअंतर्गत विषयांकित ठिकाणी पाणी पुरवठा करणेकरीता नव्याने उभारणेत येणा-या पंप हाऊस करीता नवीन लघुदाब थ्री फेज विद्युत पुरवठा मिळणे करीता इकडील पत्र क्र.जशुके/वि/१/कावि/६४/१९ दि. २/३/२०१९ अन्वये म.रा.वि.वि.कं. यांस मागणी करणेत आलेली होती. म.रा.वि.वि.कं. यांनी त्यांचेकडील सिस्टीम जनरेटेड इस्टीमेट क्र.११८९८६०५ दि.१०.०५.१९ अन्वये त्याबाबतचे फर्म कोटेशन दिले आहे. सदर फर्म कोटेशननुसार म.रा.वि.वि.कं. यांस

विषयांकित कामाकरीता अनामत रक्कम, करारनामा फी, प्रोसेसिंग फी, पर्यवेक्षण शुल्क व जीएसटी इ. असे एकूण र.रू.७५,२२५/- अदा करून, सदरचे काम म.न.पा मार्फत पूर्ण करणेबाबत कळविले आहे. तथापि सदरचे काम म.रा.वि.वि.कं. यांच्या पर्यवेक्षणाखाली करणेत येत असल्याने वरील नमूद शुल्क म.रा.वि.वि.कं. यांस अदा करणे आवश्यक आहे. सदर कोटेशन शुल्क र.रु.७५,२२५/- (अक्षरी र.रु.पंच्याहत्तर हजार दोनशे पंचवीस फक्त) खर्च रकमेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता मिळणे आवश्यक आहे. सबब म.न.पा.च्या श्रीनगर रहाटणी पाण्याच्या टाकीजवळ नव्याने उभारणेत येणा-या पंप हाउस येथे लघुदाब वीज पुरवठा घेणेकामी म.रा.वि.वि.कं. यांस वीजपर्यवेक्षण व इतर शुल्क र.रु.७५,२२५/- (अक्षरी र.रु.पंच्याहत्तर हजार दोनशे पंचवीस फक्त) अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/३/कावि/५११/२०१९
दिनांक – १७/०५/२०१९

**टिप -** प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.